# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२/०७/२००९ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०६) इतिवृत्त

रविवार, दिनांक १२ जुलै २००९ रोजी स्थायी समितीची सभा, स्थायी समिती सभापती माननीय **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली "सागर दर्शन विश्रामगृह (आय.बी.)", मराठवाडा प्रबोधिनीच्या शेजारी, जायकवाडी, पैठण (जि.औरंगाबाद) येथे दुपारी १२.१५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
३. श्री.जावेद हसन खान
४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
५. श्री.शिंदे दामोधर माधवराव
६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
७. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
१०. श्री.सुरे सिताराम इसराम
११. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
१३. श्री. प्रल्हाद निमगांवकर

**<u>विषय क्र. ३३ :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन २००९-२०१० या वर्षीचे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार मंजुरी देणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी :आज महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी अर्थसंकल्पाच्या बैठकी करीता या निसर्गरम्य वातावरणात आलोलो आहे त्याबाबत आपले अभिनंदन करण्यात येते.

श्री.नारायण कुचे : आज आपल्या बैठकीला नविन आयुक्त हजर आहे त्यांनी दोन दिवसांपूर्वीच पदभार स्विकारला आहे व ते आज बजेटच्या बैठकीस हजर राहिले त्या बाबत त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : मा.आयुक्त साहेबांनी आपला परिचय सभागृहास करून द्यावा.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी आपला परिचय करून द्यावा.

मा.आयुक्त : परवा संध्याकाळी औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त म्हणुन रूजु झालेलो आहे. मी नगर जिल्हयातील असुन अमरावतीमध्ये जिल्हाधिकारी म्हणून दोन ते सव्वादोन वर्ष काम केलेले आहे. यापुर्वी पुणे जिल्हा परिषद,धुळे जिल्हा परिषद,परभणी जिल्हा परिषद या जिल्हा परिषदांचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केलेले आहे.उपआयुक्त म्हणुन पुणे,नाशिक याठिकाणी काम केलेले आहे. कृषी विद्यापीठात रजिष्ट्रार म्हणून काम केलेले आहे. जवळपास 24 वर्ष असा प्रशासकीय कामाचा अनुभव आहे.

श्री.विनायक पांडे : मा.आयुक्तांनी आपला परिचय करून दिलेला आहे, दिर्घकाळ राहण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे, त्या संदर्भात सर्व नगरसेवकामार्फत त्यांचे अभिनंदन करण्यात येते. जास्तीत जास्त चांगले काम त्यांचे हातून व्हावेत हि इच्छा व्यक्त करतो.

मा.सभापती : स्थायी समितीच्या वतीने व सर्व अधिकाऱ्यांचे वतीने मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते. मा.आयुक्त साहेबांनी कमीत कमी 3 वर्ष राहावे. विकासाच्या कामांना आम्ही पुर्णपणे सहकार्य/मदत करू व त्यांनी विकासाचे कामे मार्गी लावावे. सर्वांच्या वतीने मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.प्रशांत देसरडा : सन 2009-10 या बजेटच्या संदर्भात आपण सर्वजण उपस्थित आहोत. जी जमा बाजू आहे आपली त्यात तीन चार सोर्स मोठे आहे जसे मालमत्ता कर आकरणी, पाणी पट्टी, जकात आणि आपले विविध शासकीय अनुदान आहे वार्ड वाईज टारगेट किती देण्यात आले होते. मुळ अंदाजपत्रकात किती टारगेट दिले होते. वसुली किती केली वार्ड वाईज खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा प्रशासनाने करावा.

उपआयुक्त (प्र) : मागच्या वर्षामध्ये मालमत्ता करामध्ये वॉर्डाचे सुधारीत उद्दीष्ट रू. 47,55,47,619 दिले होते.

श्री.प्रशांत देसरडा : मुळ अंदाजपत्रकात किती कोटीचे टार्गेट दिले होते.

उपआयुक्त (प्र) : 47 कोटीमध्ये वसुली 29 कोटी झालेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : मुळ अंदाजपत्रकात किती टार्गेट ठेवले होते.

श्री.रविकांत गवळी : एकुण करासंदर्भात किती तरतुद ठेवलेली होती, 47 कोटीची डिमांड होती 29 कोटी वसुल झालेले आहे.

उपआयुक्त (प्र) : मुळ डिमांड 56 कोटीची होती.

श्री.प्रशांत देसरडा : वार्ड वाईज किती कोटीची तरतुद ठेवली होती.

उपआयुक्त (प्र) : रिवाईजची फिगर आहे.

श्री.प्रशांत देसरडा : रिवाईजमध्ये 47 कोटी केली असेलतर वार्ड वाईज किती होते. बजेटची संकल्पना अशी असते की, सर्वप्रथम प्रभाग समितीच्या बैठकीत बजेट ठेवले.

जाते आणि प्रभाग समिती स्थायी समितीकडे बजेट ठेवते. प्रभाग समितीच्या बैठकीच झालेल्या नाहीत, हि चुकीची पध्दत आहे. आम्ही प्रभाग समितीचे सदस्य आहोत एखादी बैठक झाली नाही तर प्रभाग समितीच्या सभापतीच्या सहया आणतात एकीकडे प्रभाग समिती सक्षमकरा म्हणुन म्हणतात. प्रभाग समितीत बजेटची बैठक घेणे आवश्यक होते. वार्ड वाईज अ,ब,क,ड ची वसुली संदर्भात खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (प्र) : वार्ड अ मध्ये 38 कोटीची मागणी होती.

श्री.प्रशांत देसरडा : 47 कोटी मध्ये वार्डवाईज किती कोटी होती.

उपआयुक्त (प्र) : वार्ड-अ ची थकबाकी आणि मागणी 3.81 कोटी व 2.77 कोटी वसुली झाली. ब वार्डात 14.65 उद्दीष्ट व वसुली 6.97, क वार्डात 3 कोटी 50 लाख उद्दीष्ट व वसुली 1 कोटी 58 लाख रूपये, ड वार्डात 7 कोटी 20 लाख उद्दीष्ट व वसुली 7 कोटी 14 लाख रूपये, इ वार्डात 8 कोटी उद्दीष्ट व वसुली 3 कोटी 25 लाख रूपये, फ वार्डात 10 कोटी उद्दीष्ट व वसूली 8 कोटी रूपये.

श्री.प्रशांत देसरडा : वार्ड अ ची थकबाकी आणि मागणी 3.81 कोटी अपेक्षीत होती यामध्ये चालू वर्षाची डिमांड किती होती आणि थकबाकी किती होती.

उपआयुक्त (प्र) : वार्ड अ ची थकबाकी 1 कोटी 3 लाख आणि चालु डिमांड 2 कोटी 43 लाख.

श्री.रविकांत गवळी : मा.उपआयुक्त जो तक्ता वाचुन दाखवत आहे तो आमच्याकडे प्राप्त झ ालेला आहे. जो तक्ता आलेला आहे तो वार्ड कार्यालयाकडुन आलेला आहे. हि वस्तुस्थिती आहे. वार्ड ड ची मागील थकबाकी 3 लाख रूपये हि तक्त्यात माहिती आहे 3 लाख रूपये मागील थकबाकी असु शकते काय? एकाच प्रॉपटीचे 3 लाख रूपये वसुली होईल. वार्ड अधिकारी सांगतात की, 100 टक्के वसुली झाली म्हणून मागील जर 3 लाख थकबाकी दाखविली तर 100 टक्के वसूली होणारच आहे.

श्री.प्रशांत देसरडा : महानगरपालिका स्थापनेपासुन आज पर्यंत जर थकबाकी काढली तर ती किती होईल. 200 कोटी छापून टाका. एक कोटी वसुली मागील वर्षीची रिवाईजमध्ये जी रक्कम ठेवली होती तिचा जो गॅप आहे ती 1 कोटी 03 लाख रूपये आहे. महानगरपालिकेची उधारी नाही. मागच्या वर्षीची रिवाईजमध्ये दिलेली रक्कम आणि वसुलीत असलेली तफावत हि एक कोटी 3 लाख आहे. मुळ वसुली नागरीकांमधुन किती करायची त्याचा रेकॉर्ड महानगरपालिकेकडे आहे का? प्रशासनाचे म्हणने आहे की, 63 टक्के वसुली झाली परंतु जो 25 टक्केचा गॅप आहे हाच पुढच्यावर्षी थकबाकीमध्ये दाखवितात.

उपआयुक्त (प्र) : स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो मुद्दा त्या पध्दतीचा नाही. मागच्या वेळेस जे एरीयस दाखविले ते कॅरि फॉरवर्डमध्ये घेतलेले आहे. थकबाकी घेतलेली आहे आणि चालू डिमांड वेगळी दाखविलेली आहे.

श्री.विनायक पांडे : आत्ता पर्यंतची मुळ थकबाकी अ वार्डातील किती आहे. गेल्या दहा वर्षात किती नागरीकांकडे थकबाकी आहे.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : चालू मागणी 5 कोटी रूपये असू शकते काय? |
| उपआयुक्त (प्र) | : हि वस्तुस्थिती नाही, मागच्या महिण्यात जेव्हा हा मुद्दा उपस्थित झाला त्यावेळी मा.आयुक्तांनी सर्व वॉर्ड अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते की, हि वस्तुस्थिती असु शकत नाही म्हणून फेरतपासणी करून वास्तवात 2001 पासुन ते आत्तापर्यंत प्रत्येक रजिष्ट्रची तपासणी केली. त्यावर्षाची डिमांड किती आणि वसुली किती तपासणी केल्यानंतर असे निर्देशनास आले की, वार्ड ड मध्ये वास्तवात थकबाकीची फिगर आलेली आहे ती 6 कोटीची आहे आणि ती रिवाईजमध्ये सभागृहापुढे देणार आहोत. |
| श्री.प्रशांत देसरडा | : मागच्या वर्षी 56 कोटी रूपये अपेक्षीत ठेवली होती 29 कोटी वसुल झाले 27 कोटी बाकी आहे. |
| उपआयुक्त (प्र) | : चालू वर्षामध्ये घेतलेले आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : अ वार्डात मागच्या वर्षी 1 कोटी 3 लाख रूपये मागच्यावर्षी बाकी होती या वर्षीची जी 25 कोटींची तुट आहे. वाढीव 60 कोटी जरी धरली थकबाकी 25 कोटी अशी 60+25=85 कोटी व्हायला पाहिजे. 56 कोटी टार्गेट ठेवले रिवाइजमध्ये 47 कोटी ठेवले अपेक्षीत 29 कोटी वसुल झाले. हे एका वर्षाचे आहे मागील 10 वर्षात किती बाकी असेल. |
| उपआयुक्त (म) | :त्यामध्ये 17 कोटी एरिअस आहे डिमांड आहे 26 कोटीची. |
| श्री.प्रशांत देसरडा | :56 कोटी मुळ रक्कम होती 56 कोटी ठेवली असेल आणि 29 कोटी वसुल झाली असेल 25 कोटी सरासरी थकबाकी आहे. 25 कोटी आणि आत्ताची 56 कोटी वाढीव होणार नाही म्हणजे 85 कोटी. |
| श्री.रविकांत गवळी | :10 टक्के नैसर्गिक वाढीचा विषयच नाही. कागदाला कागद लावत जातो. अंदाजपत्रकात सर्वात महत्वाची बाजू म्हणजे जमा बाजू आज जकात सोडल्यानंतर मालमत्ता कर आकारणी मध्ये वाढ झाली पाहिजे संपूर्ण वर्षात 29 करोड रूपये मालमत्ता कराची वसुली करतो. स्पेकने 1,46,000 नविन मालमत्ता शोधलेल्या आहेत, जे 29 करोड रूपये वसुल झालेले आहे ते वार्ड कार्यालयाच्या माहितीच्या अनुषंगाने जमा झालेले आहे. आज रोजी मुळामधे बाकी किती आहे याची माहिती नाही. कुठल्या कार्यालयाकडुन किती बाकी येणे आहे याचा कुठे उल्लेखच नाही. एमएसईबी चे विसाव्या दिवशी बिल येते आज रोजी त्यांची बाकी किती आहे याबाबतची माहिती मिळते,व बिल प्रत्येक महिण्याला पाठविले जाते. अशाप्रकारे महानगरपालिकेतर्फे नोटीसा बजवायला पाहिजे परंतु महानगरपालिकेलाच मुळ किती बाकी आहे याची माहिती नाही. |
| श्री.प्रशांत देसरडा | :या हिशोबाने या वर्षी दोनशे कोटी रूपये छापुन टाकण्यात यावे. |
| श्री.विनायक पांडे | :सन 2001 पासून बांधकाम परवानी बाबत चर्चा केली तर किती तरी तफावत दिसुन येईल. जसे डिपॉसिट भरून परवानगी घेतली त्या सर्वांचे कम्प्लीशन आले का ? |
| श्री.प्रशांत देसरडा | :मागील वर्षी पाणीपट्टी,मालमत्ता कर थकबाकी असलेल्या थकबाकीदारांना थकीत रकमेवर व्याज लावल्यामुळे थोडया प्रमाणात का होईना 56 कोटी वसुली झाली होती परंतु या वर्षी व्याज लावण्याची मुभा दिली नाही. वसुली |

संदर्भात प्रचार प्रसार जनजागृती केली नाही. वसुली करीता नागरीकांकडे जावून जागृती केली पाहिजे 10 वर्षांची थकबाकी आहे 200 कोटीच्या वर जावू शकते. यावर्षी 85 कोटीचे तरी करावे.

श्री.रविकांत गवळी :सिडको हडकोत मालमत्ता कर किती लावला व वसुली किती झाली याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :प्रत्येक वार्ड अधिकाऱ्यांना बोलावुन थकबाकी किती आहे याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :वार्ड ब अधिकारी यांनी खुलासा करावा किती थकबाकी आहे.

श्री.रविकांत गवळी :सिडको हि एक प्लॅनिंग सिटी आहे त्या ठिकाणी सर्वे करण्याची गरज नाही आज रोजी किती कर लावयाचा याबाबतीत सर्वे करणे अतिशय सोपे आहे. आज रोजी वार्ड ब कार्यालयाची किती कर आकारणी झाली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :किती कोटींचा टॅक्स वसुल झालेला आहे.

वार्ड ब अधिकारी :टार्गेट 14.62 कोटींचे दिले होते त्यापैकी 7 कोटी वसुल झालेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :प्रत्येक वर्षी 7 कोटी बाकी आणि चालू मागणी थकबाकी राहते. हि थकबाकी विसरून जायचे का?

श्री.रविकांत गवळी : जुणे शहरामध्ये नविन शहराचा भाग किती होता. एकुण कर आकारणीमध्ये किती कर आकारणी येत होती. सन 2005 पर्यंत 9000 प्रॉपर्टी शोधुन काढल्या तिन वर्षात सहा वार्डाने 1000 नविन प्रॉपर्टी शोधल्या आहेत प्रत्येक वार्डात साधारणत:250 ते 300 नविण प्रॉपर्टि निर्माण झालेल्या आहेत. माझ्या मते प्रत्येक वार्डामध्ये 3180 नविन प्रॉपर्टी निर्माण होत आहे. दर वर्षी 10 टक्के नैसर्गिक वाढ नविन प्रॉपर्टी वाढविले जाते.MSEB ची 20 दिवसानंतर वसुली झाली नाही तर डयु लावला जातो. तसे महानगरपालिकेत होत नाही. हे जाणीवपुर्वक होते का? मालमत्ता कर हे एक सॅम्पल आहे मालमत्ता कराची वसुली किती सक्षमपणे केली.

मा.सभापती : 25 कोटी रूपयांचे दरवर्षी नुकसान होत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :पाणीपट्टीची यापैक्षा जास्त वाईट परिस्थिती आहे. महानगरपालिकेकडे चोकअप काढण्यासाठी पैसे नाही कर्मचाऱ्यांचे तिन महिण्यांचे पगार अगाउ बँकेत ठेवावे लागतात ते सुध्दा ठेवण्यात आलेले नाही एवढी गंभीर परिस्थिती महानगरपालिकेची झालेली आहे.

श्री.रविकांत गवळी :कर आकारणी करण्याची अमंलबजावणी सक्षमपणे करण्याचे ठरविले तर वसुली होइल. मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब असतांना 4123 नविन प्रॉपर्टी शोधून काढल्या होत्या.

मा.सभापती :मा.आयुक्त श्री.वैद्य साहेबांनी आदेश दिले होते.

श्री.रविकांत गवळी :मागील वर्षीचे स्पिल ओव्हरचे कामे प्रलंबीत आहे वर्क ऑर्डर देवूनही कामे झालेली नाही या विषयावर चर्चा झाली पाहिजे. अंदाजपत्रकात वॉर्ड ड ची थकबाकी 3 लाख रूपये दाखविण्यात आलेली आहे. वार्ड कार्यालयाचा लेखी खुलासा चुकीचा असेल तर काय कार्यवाही करण्यात येईल. वार्ड ड ची थकबाकी 3 लाख रूपये दाखविण्यात आलेली आहे. 7.25 कोटी मागणी, 7.14 कोटी वसुल झालेली आहे. म्हणजे 100 टक्के वसूली झाली आहे हे

कसे शक्य आहे,सदरची माहिती चुकीची दिली आहे वार्ड ड अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म) : वार्ड ड अधिकारी हजर नाही.

श्री.प्रशांत देसरडा : ट्रायल बेसीस वर 1-2 वार्ड घ्या , 1-2 दिवस सर्वसाधारण सभा/स्थायी समिती सभेत आदेश देवूनही वसुली संदर्भात परिणाम होत नाही. काही ठिकाणी पाणी पुरवठयावर साधारणत: 4200 प्रति नळ केनक्शन खर्च येतो आणि पाणी पुरवठा प्रति कनेक्शन रूपये 1800 वसुली करतो. आपल्याला वसुली किती करायची डिमांड किती याबाबत माहितीच नाही तर वसुली कशी होणार. प्रॉपर्टी टॅक्स वसूली खाजगी तत्वावर आहे का पहावे, विद्युत मंडळाकडे एक शिष्टमंडळ ट्रायल बेसीसवर पाठविण्यात यावे. टेलिफोन बिल 80 पैशात घरी येते, परंतु आपली डिमांड 38 रूपये प्रति खर्च येतो कर्मचारी मात्र पगार घेतात, शनिवार रविवार सुट्टी मागतात प्रत्येकी डिमांड 38 रूपये खर्च येत असेलतर काय फायदा टेलिफोन ऑफिसचे 80 पैशात प्रति डिमांड वाटले जाते. टेलिफोन ऑफिस, विद्युत मंडळ ट्रायल बेसीसवर शिष्टमंडळ पाठविण्यात यावे. खाजगी तत्वावर मालमत्ता व पाणीपट्टी वसुली देण्यात यावी म्हणजे शहराचा चेहरामोहरा बदलेल.

श्री.रविकांत गवळी : 2005 ला कर आकारणी एकत्र होती. दरवर्षी 8 ते 9 हजार शोधत असतो. दरवर्षी 14000 वाढणार. 22 वर्षानंतरही तेच घर दाखवून रू.622/- कर आकारणी होते. 4 मजली इमारत होते. अशा मिळकतीवर कर आकारणी केली पाहिजे.

श्री.प्रशांत देसरडा : पाणीपट्टी संदर्भात कुठल्याही महानगरपालिकेत नगरसेवक पाणीपट्टी वाढविण्यास सांगणार नाही परंतु आम्ही वारंवार 1000-500ने पाणीपट्टी वाढवा म्हणुन सांगत आहे परंतु प्रशासनाने दखल घेतलेली नाही. महाराष्ट्र शासनाने तयार केलेले ना नफा ना तोटा तत्वावर पाणीपुरवठा योजना राबविण्यात यावी . मालमत्ताचे रिवीजन केव्हा झाले आहे याबाबत खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (प्र) : मुंबई प्रांतिक महागरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीनुसार दर वर्षाला रिव्हीजन करण्यात यावे. नगरपरिषद कायद्यात दर 4 वर्षाला रिव्हीजनची तरतुद आहे. ज्या वर्षी Identify होईल त्या वर्षी मालमत्ता कर आकारणी करायला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : दरवर्षी टॅक्स लावयला पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : चार रूमचे घर असेलतर कर्मचारी एकाच रूमला टॅक्स लावला जातो.

श्री.सतिष कटकटे : नविन इमारतीचे बांधकामाबाबत माहिती कशी मिळते.

मा.सभापती : ADTP यांनी खुलासा करावा. बांधकाम किती व भोगवटा प्रमाणपत्र किती.

प्र. सहा.सं.न.र.
(श्री.कुलकर्णी) : दरवर्षी 900 ते 1000 बांधकाम परवानगी दिली जाते त्यातील साधारणत: 700 ते 750 Completion Certificate दिले जाते.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : 99 टक्के Completion झाले नाही. महानगरपालिकेचे 13.50 करोड रूपये बाकी आहे. |
| मा.सभापती | : 700 Completion Certificate दिले जाते चुकीची माहिती देवू नका. |
| श्री.रविकांत गवळी | : स्पेकने डाटा हँडओव्हर केला आहे. डिमांड, संगणकीकरण, स्पेकने दिलेले कागदपत्र उपलब्ध नाही म्हणून पेडींग पडलेले आहे. त्याकडे लक्ष द्यावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : मा.उच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट दिले आहे. मा.आयुक्तांच्या पर्सेनल लॅप टॉप मधे डाटा ट्रान्सफर केला व त्याचे 1.20 कोटी बील दिले आहे. |
| मा. सभापती | : मा.उच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट दिले आहे कि, 54 लाख रूपये स्पेककडुन वसुल करण्यात येईल. त्याबाबतीत काय झाले आहे खुलासा करण्यात यावा. डिमांड दिली का. |
| सहा.विधी सल्लागार | :जी नोटीस दिली आहे त्या संबधी प्रक्रिया चालु केलेली असुन डाटा कलेक्ट करण्याची आणि गुन्हा नोंदविण्याची कारवाई सुरू केलेली आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :किती दिवसांची मुदत दिली आहे. |
| प्र. विधी सल्लागार | :कारवाई सुरू केलेली आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :त्यावेळचे मा.आयुक्तांनी मा.उच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट दिले होते. 54 लाख वसुल करू 15 लाख बँक गॅरंटी जप्त केले. मा.उपआयुक्त यांच्या वतीने सांगीतले की गुन्हा तात्काळ दाखल करा असे सांगून 15 दिवस झाले परंतु गुन्हा दाखल झाला नाही. |
| मा.सभापती | :मा.उच्च न्यायालयाने 15 लाख रूपये भरा असे सांगण्यात आले होते का? |
| प्र.विधी सल्लागार | :मा.उच्च न्यायालयाने नोटीस दिलेले आहे 15 दिवसात रक्कम भरा. |
| श्री.प्रशांत देसरडा | :त्याच्यानंतर काय कारवाई केली. |
| प्र.विधी सल्लागार | :कारवाई केलेली आहे रिकवरीसाठी श्री.कानडे वकील नियुक्त केले आहे. |
| मा.सभापती | :15 दिवसांत त्यांच्याविरूध्द गुन्हा का नाही दाखल झाला? |
| श्री.प्रशांत देसरडा | :त्यांचे पुर्ण प्रापर्टीवर पि.आर. कार्डवर बोजा टाका. त्याच्या प्रॉपर्टीची डिटेल देतो. तो मनपात फिरतो. एखादवेळी फाईल गायब होईल. |
| मा.सभापती | :54 लाख रूपये तात्काळ भरण्याची कारवाई करण्यात यावी व त्यांच्या प्रॉपर्टीवर बोझा टाकण्यात यावा. स.स.श्री.देसरडा यांचेकडून माहिती घ्यावी. |
| श्री.रविकांत गवळी | :वार्ड अधिकाऱ्यांची वसुली करण्याची मानसिकता नाही. |
| मा.सभापती | :वार्ड क चे अधिकाऱ्यांनी वसुली संदर्भात खुलासा करण्यात यावा. |
| वार्ड क अधिकारी | :3.50 कोटी उद्दीष्ट व वसुली 1.5892 झाली आहे. मागील थकबाकी 2.1 कोटी रूपये + चालू 1.48 कोटी असे एकुण डिमांड रूपये 3.50 कोटी रुपये आहे. सुमारे 45 % वसुली झालेली आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :वसुली कोण करतो. |
| वार्ड क अधिकारी | :वसुली कर्मचारी करतात वर्ग 3 आणि वर्ग 4 चे कर्मचारी वसुली करतात. |
| श्री.रविकांत गवळी | :सदरील सर्व कर्मचारी वसुली करतात का? |
| श्री.सतिष कटकटे | :मजुर कर्मचारी वसुली करतात. |
| वार्ड क अधिकारी | :वसुलीसाठी वर्ग चारचे 18 कर्मचारी आणि वर्ग तीनचे 5 कर्मचारी आहे एकुण 23 कर्मचारी आहे. |

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :23 कर्मचारी 365 दिवसांमध्ये 1.58 लाख रुपये वसूली करतात पगार मात्र वेळेवर घेतात. त्यांचे पगाराएवढीही वसुली केली जात नाही पगाराचा खर्च पहाण्यात यावा. 1 लाख 58 हजार रुपये 23 कर्मचाऱ्यांनी वसुली केलेली आहे. रोजचे कलेक्शन पहाण्यात यावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :1 कोटी 48 लाख रूपये डिमांड होती एका एका वार्डाला वसुली केली 10 लाख रूपये एका एका वार्डाला 23 कर्मचारी वसुलीसाठी आहे परंतु वसुली मात्र होत नाही. मंगल कार्यालाचीच वसुली 3 ते 4 लाख रूपये होती. दोन हजार घरांना एक हजार प्रमाणे किती वसुली होती. वसुली करण्याची कर्मचाऱ्यांची मानसिकताच होत नाही. या वार्डाची चौकशी लावण्यात यावी. एका वार्डात अडीच कोटी रूपये वसुली आहे. किती घरांना खऱ्यास्वरूपाचा टॅक्स लावण्यात आला आणि वसुली किती प्रमाणात झाली याबाबत एक कमिटी नेमुन चौकशी करण्यात यावी. |
| मा.सभापती | :मा.आयुक्त आलेले आहेत ते काम करून घेतील आशावादी राहा. वार्ड क मध्ये मी स्वत: राहतो माझ्या पाच रूम आहे. वार्डमध्ये किती मंगल कार्यालय किती आहेत खुलासा करण्यात यावा. |
| वार्ड क अधिकारी | :साधारणत:2 ते 3 मंगल कार्यालय आहेत. |
| मा.सभापती | :54 मंगल कार्यालय आहे मंगल कार्यालयाची यादी देण्यात यावी. |
| श्री.रविकांत गवळी | :जो खुलासा केलेला आहे तो खुलासा योग्य नाही. मा.उपआयुक्त(प्र) यांनी निर्देश दिले होते की सर्व वार्ड अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे जे अधिकारी आले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. |
| वार्ड क अधिकारी | :माझ्या वार्डात पाच कर्मचारी वसुलीसाठी आहे. |
| मा.सभापती | :100 टक्के डिमांड रेज केलेली आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :जी थकबाकी आहे तिच दिली आहे या व्यतिरीक्त काही थकबाकी आहे का? मागील थकबाकी 19217837 रूपये दिलेली आहे. |
| वार्ड क अधिकारी<br>श्री.राठोड | :1.92 थकबाकीक आहे. 3.37 कोटीची एकुण मागणी आहे व चालू<br>1.65+1.92=3.37 कोटी रूपये अशी आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :या व्यतिरीक्त थकबाकी नाही हे सत्य आहे म्हणुन नोंद घेण्यात यावी. |
| वार्ड क अधिकारी | :माहिती सत्य आहे. |
| मा.सभापती | : वार्ड क अधिकारी यांचा खुलासा असमाधानकारक आहे. अ व ड वार्डाचे अधिकारी हजर नाही. मा.उपआयुक्त (म)यांना सूचना करण्यात येते की सर्व वार्ड अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलवावे. |
| श्री.विनायक पांडे | :वार्ड ड मध्ये थकबाकी 35775000 आहे. |
| मा.सभापती | :टाईपिंग मिस्टेक असु शकते. श्री.निकम यांना सुट्टीवर जाण्याचे कारण नाही. वार्ड अधिकारी यांना बैठकीसाठी हजर रहाण्यासाठी आदेश दिले होते. जे अधिकारी हजर नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. |
| वार्ड इ अधिकारी | : थकबाकी साधारणत: 5 कोटी 35 लाख रूपये आहे. चालू मागणी 2 कोटी 18 लाख अशी एकुण आठ कोटी रूपये आहे. मागील 5.35 कोटी+2.56 कोटी =7.92 कोटी. जवळपास 40 टक्के वसुली झालेली आहे. एप्रिल |

पासून 24.61 लाख वसुली झालेली आहे. पाणीपट्टीचे 19,12,000/- वसुल झालेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :बजेटबुकमध्ये काही बाबी योग्यरित्या आलेल्या नाहीत,बजेटबद्दल कायदेशीर कार्यवाही होईल पहावे. कोणी जनहित याचिका दाखल केलीतर आम्हाला दोषी धरण्यात येवु नये.

मा.सभापती :टॅक्स कोण लावू शकतो.

श्री.रविकांत गवळी :टेक्निकल व्यक्तीने कर लावला पाहिजे नसता तो ग्राहय धरता येणार नाही. टेक्निकल व्यक्तीने कर लावला गेला पाहिजे.

श्री.प्रशांत देसरडा :न्यायालयात प्रॉपर्टी टॅक्सच्या केसेस बऱ्याचश्या प्रलंबीत आहे एखादी प्रॉपर्टी ची केस महानगरपालिका जिंकते. टॅक्स लावण्याच्या प्रक्रियेमध्ये महानगरपालिका जिंकू शकत नाही. न्यायालयात प्रॉपर्टी टॅक्सच्या किती केसेस प्रलंबीत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

प्र.विधी सल्लागार :टॅक्स संदर्भांत बरीचशी प्रकरणे प्रलंबीत आहे. मा.न्यायालयात सुमारे 843 प्रकरणे दाखल झालेले आहेत.

श्री.प्रशांत देसरडा :प्रकरणे निकाली किती काढण्यात आली आहे.

प्र.विधी सल्लागार :प्रकरणाचा निर्णय लागतो. प्रोसिजर अडोप्ट केली जात नाही म्हणुन केस प्रलंबीत राहतात. कर निर्धारक व संकलक टॅक्स आकारतात.

श्री.प्रशांत देसरडा : टॅक्स ॲसेसमेंट करण्याचा अधिकार कुणाला.

उपआयुक्त (प्र) :नियमाप्रमाणे मा.आयुक्तांना अधिकार आहे वार्ड अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केलेले आहे.

श्री.रविकांत गवळी :असे कोर्टात देवू शकतो काय? जे न्यायालयीन प्रकरणे चालू आहे त्यातील एकही प्रकरण महानगरपालिकेने जिंकलेले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : मा.आयुक्तांना टॅक्स ॲसिस करण्याचा अधिकार दिलेला आहे तो कायदेशिर आहे काय?

उपआयुक्त(प्र) :मा.आयुक्तांना अधिकार आहे. 20 फेब्रुवारीपासून Adoption Authentication आहे. कलम 69 प्रमाणे करू शकतात कायदेशिर आहे.

प्र.विधी सल्लागार :प्रोसिजरमध्ये कमतरता असल्याने समस्या निर्माण होतात. जसे नोटीस सर्व्हिस करणे, घेणे,नांव,सही याबाबत उणीवा निर्माण होत असल्याने समस्या येतात. मा.आयुक्तांनी सन 2005 पासुन वार्ड अधिकाऱ्यांना व्हॅल्युएशन करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहे, सन 2005 पासून वार्ड ऑफिस व्हॅल्युएशन करत आहे.

श्री.रविकांत गवळी :टेक्निकल व्यक्तिची आवश्यकता नाही अशी तरतुद आहे.

मा.सभापती :नियमात कुणाला अधिकार आहे.

प्र. विधी सल्लागार :नियमात तसे सांगीतलेले नाही. महानगरपालिकेत सुरवातीला मुल्यनिर्धारण अधिकारी टॅक्स ॲसेसमेंट करत होते.

मा.सभापती :दिनांक 07.12.1981 पासुन कोण ॲसेसमेंट करत होते.

प्र. विधी सल्लागार :जी प्रोसेस ॲडोप्ट करायला पाहिजे ती ॲडोप्ट केलेली आहे.

श्री.रविकांत गवळी :आठ हजार ते दहा हजार नविन मालमत्ता शोधलेल्या आहेत त्यावर टॅक्स लावण्यात आला आहे काय?

| | |
|---|---|
| मा.सभापती | :इतर महानगरपालिकेमध्ये मालमत्ता व्हॅल्युएशन कोण करतो. |
| उपआयुक्त (प्र) | :करमुल्य निर्धारण अधिकारी मालमत्तांचे कर आकारणी करतात. |
| श्री.प्रशांत देसरडा | :सर्व वार्ड अधिकाऱ्यांची माहिती आलेली आहे, एका एका वार्डामध्ये लाखो करोडो रूपयांची थकबाकी आहे. याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे थकबाकी 85 कोटी रूपये डिमांड ठेवण्यात यावी. वार्ड क ची चौकशी झाली पाहिजे. एका एका वार्डात ट्रायल बेसीसवर खाजगी व्यक्तिंना नेमण्यात यावे. |
| मा.सभापती | :जायकवाडीतुन पाणी आणण्यासाठी किती खर्च येतो. |
| श्री.रविकांत गवळी | :MSEB वरच सर्वात जास्त खर्च येतो. |
| मा.सभापती | :मा.आयुक्तांना कल्पना दिलेली आहे. |
| श्री.विनायक पांडे | :नळ कनेक्शन ज्याप्रमाणात आहे त्याप्रमाणे बिल आकारायला पाहिजे. |
| मा.सभापती | : 97 हजार पिआर कार्ड आहे 26 हजार 7/12 आहेत. 3 लाख घरे आहेत. 1 लाख 40 हजाराची नोंद आहे. दिनांक 07.12.1982 ते आज पर्यंत बांधकाम परवानगी 25000 पैक्षा जास्त व 4000 पेक्षा जास्त Completion Certificate दिलेले नाही. सन 1983 पासून किती बांधकाम परवानगी दिलेली आहे याबाबतची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी. महानगरपालिकेमध्ये सहा वार्ड कार्यालयाच्या क्षेत्रात लाखो मिसिंग प्रॉपर्टी शोधून काढण्यात आलेल्या आहेत. सनि सेंटरला एका अधिकारी यांनी 7 पैसे पर स्के.मि.चा रेट लावलेला आहे. अशा प्रकारे एका एका प्रकरणाची चौकशी केली असता आठ लाख रूपयांचे नुकसान आहे. टॅक्स लावण्याचे काम टेक्निकल लोकांनी केलेले आहे. ज्यांचे काम त्यांनी करावे असे कोर्टाने सांगीतले आहे. महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये फक्त 1100 उद्योगधंदे आहेत. |
| श्री.रविकांत गवळी | :शासकीय कार्यालयाना टॅक्स लावला पाहिजे. शासकीय कार्यालयांना का नाही टॅक्स लावण्यात आला. शासकीय कार्यालयांना डिमांड दाखवा ते पैसे भरतील. |
| श्री.नारायण कुचे | :पोलिस स्टेशनला टॅक्स लावू शकतो का? न्यायालयाच्या इमारतीस टॅक्स लावू शकतो काय? |
| वार्ड इ अधिकारी | :न्यायालयाच्या इमारतीस दोन लाख रूपये टॅक्स लावण्यात आलेला आहे. उच्च न्यायालयाच्या इमारतीस टॅक्स लावण्याची प्रक्रिया चालू आहे सदरील प्रकरण न्यायालयीन आहे. 56 लाखाची थकबाकी आहे दरवर्षी 2 लाख रूपये भरतात. |
| श्री.रविकांत गवळी | :एकुण किती कर बाकी आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :शहरात एअरपोर्ट, फाईव्ह स्टार हॉटेल आहेत व इतर हॉटेल्स आहेत. |
| मा.सभापती | :एकही Completion पाठविलेले नाही. |
| श्री.नारायण कुचे | :विमानतळ,पोलिस स्टेशनला टॅक्स लावायला पाहिजे. मुकुंदवाडी पोलीस स्टेशन इमारतीला टॅक्स लावला आहे का. |
| मा.सभापती | :पुर्वी उच्च न्यायालयाच्या इमारतीस कोणी टॅक्स लावला होता कुणी ॲसेसमेंट केले. स्पेक कंपणीने ॲसेसमेंट केलेले आहे. एमजीएमकडे किती थकबाकी आहे खुलासा करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| वॉर्ड अधि. वार्ड-फ | : एमजीएमकडे 1.30 कोटी थकबाकी आहे. एमजीएमने न्यायालयात प्रकरण दाखल झाले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार ज्या प्रमाणे शासकीय कार्यालयांना टॅक्समध्ये सुट देण्यात येते त्याप्रमाणात एमजीएमलाही सुट मिळावी म्हणुन न्यायालयात प्रकरण दाखल झाले आहे. एमजीएमला सर्व इमारतीला टॅक्स लावला आहे फक्त अंडर ग्राउंडचा भाग सोडुन इमारतीला टॅक्स लावला आहे. |
| मा.सभापती | :संपूर्ण इमारतीला टॅक्स लावला आहे काय? |
| वार्ड फ अधिकारी | :फक्त अंडरग्राउंडला टॅक्स लावलेला नाही. ओपन प्लॉटचा टॅक्स घेत नाही. |
| मा.सभापती | :ओपन प्लॉटला टॅक्स लावला पाहिजे. |
| वार्ड फ अधिकारी | :10 बिल्डींगला 37 लाख रूपये टॅक्स लावला आहे. 100% टॅक्स लावण्यात आलेला आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जे प्रकरणे पेडिंग आहे ते निकाली काढावे. |
| श्री.रविकांत गवळी | :शहरात जे मॉल आहे त्यांना किती टॅक्स लावण्यात आलेला आहे. भारत बाजारला किती टॅक्स लावण्यात आला आहे. |
| वार्ड ब अधिकारी | :स्पेसंर मॉलला 5.87 लाख टॅक्स लावण्यात आला आहे व भारत बाजारला वेगळा टॅक्स लावण्यात आला आहे भारत बाजारचा बांधकाम झालेल्या भागाला टॅक्स लावण्यात आलेला आहे जे बांधकाम पुर्ण व्हायचे राहिले त्या भागाचा टॅक्स लावणे बाकी आहे. |
| श्री.नारायण कुचे | :प्रशासन लहान लहान दुकानांना, इमारतींना टॅक्स लावते. गरीब जनतेला प्रशासन वेठीस धरते चुकीच्या पध्दतीने टॅक्स लावण्यात येतो |
| श्री.प्रशांत देसरडा | :भारत बाजार होउन 4 वर्ष झाले आहे तरीही अजून बांधकाम बाकी असल्याचे अधिकाऱ्यांमार्फत सांगीतले जाते. |
| श्री.नारायण कुचे | :मोठ मोठया लोकांकडुन वसुली केली पाहिजे. मा.आयुक्त साहेबांनी याबाबीकडे लक्ष द्यावे. |
| मा.सभापती | :मालमत्ता करा संदर्भात सर्व सदस्यांनी प्रश्न मांडले, कोणत्याही अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली नाही. मालमत्ता कराच्या रूपाने महानगरपालिकेस अधिक उत्पन्न मिळते महानगरपालिकेची जी डिमांड आहे ती पुर्ण नाही. ज्या मोठमोठया इमारती आहेत त्यांचे करोडो रूपयांची थकबाकी आहे. टॅक्स बाबत मा.आयुक्त श्री.वैद्य साहेब यांच्यासोबत चर्चा झाली त्यावेळी त्यांनी आदेश देवून मालमत्ता कराचे Centerlise करा टॅक्सबाबत Centerlise करून टॅक्स वसुल करण्यात यावे. सन 2005 पुर्वी ज्या पध्दतीने विभाग कार्यरत होता त्याप्रमाणे करून टॅक्स वसुल करण्यात यावा. |
| श्री.प्रशांत देसरडा | :ज्या सहा वार्डात टेक्निकल नॉन टेक्निकल कर्मचारी वसुली करतात ते चेक करण्यात यावे. टेक्निकल नॉन टेक्निकल वार्ड इंजिनिअरकडे द्या् |
| मा.सभापती | :नॉन टेक्निकलकडुन टॅक्स ॲसेसमेंट करू शकत नाही. |
| उपआयुक्त (प्र) | :ज्यांनी टॅक्स लावला त्यांनी वसुल करावे हे सुत्र वापरावे लागेल. |
| मा.सभापती | :टॅक्स पासून साधारणत: 25-50 कोटी नविन वसुली होउ शकते. |
| श्री.नारायण कुचे | :Centrlise बाबत प्रशासनाचे मत घ्यावे. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | :मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेबांनी प्रायोगीक तत्वावर दिले त्याप्रमाण 3 महिण्यांसाठी देण्यात यावे. जायकवाडीतील पाणी येण्यासाठी किती खर्च येतो. |
| कार्यकारी अभियंता | :मागच्या वर्षी 37 कोटी रूपये खर्च आला होता. विद्युत देयक 27 कोटी खर्च आला. पाटबंधारे 2 कोटी रूपये इतर देयक 8 कोटी असे 37 कोटी खर्च आला. |
| मा.सभापती | :मागील वर्षी32 कोटी रूपये खर्च आला हयावर्षी 37 कोटी रुपये खर्च आला म्हणजे दरवर्षी सदरील खर्च वाढत जाणार आहे. वसुली मात्र काही नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा. |
| उपआयुक्त (प्र) | :मागणी 55 कोटीची होती वसुली 14 कोटींची आहे वसुलीचे प्रमाण 26.17 टक्के आहे अपेक्षीत 55 टक्के एवढी होती. डिमांड 65 कोटींची होती यापूर्वी वार्ड इंजिनियर वसुली होती फेब्रुवारी-2009 मध्ये वार्ड ऑफिसरकडे वसुली होती त्यामुळे प्रमाण कमी झाले. |
| मा.सभापती | :वसुलीचे प्रमाण कमी झाले किती वाढवले. |
| श्री.रविकांत गवळी | :मालमत्ता अधिकारी आणि पाणीपट्टी वसुली अधिकारी वसुली करत होते. |
| उपआयुक्त (प्र) | :जी काही वसुली झाली ती वार्ड अधिकारी यांचे मार्फत झाली आहे. |
| मा.सभापती | :पाणी पुरवठयावर 37 कोटी रुपये खर्च आला उत्पन्न 19 कोटी रुपये एका एका वार्डामध्ये 23 कोटींचा तोटा आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :शहरात व्यवसायिक नळ कनेक्शन 1100 असून एकुण 83000 नळ कनेक्शन आहेत. |
| मा.सभापती | :व्यवसायिक नळ कनेक्शन वार्ड फ मध्ये किती आहेत खुलासा करण्यात यावा. |
| वार्ड फ अधिकारी | :रेसिडेन्शीअल नळ कनेक्शन 15576 असून व्यावसायीक नळ कनेक्शनची संख्या 353 ऐवढी आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :शॉप ॲक्ट मध्ये जावून माहिती घेतलेली आहे काय? |
| श्री.प्रशांत देसरडा | :मा.सभापती यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत रू.40 हजार भरून माहिती घेतली. दोन व्यक्तींनी गठ्ठे घेऊन माहिती मा.महापौरांना सादर केलेली आहे. |
| वार्ड फ अधिकारी | :फेब्रुवारी 2007 पासुन कार्यरत आहे सन 2007 पर्यंत माझ्या पर्यंत फिगर आलेली नाही. |
| श्री. रविकांत गवळी | :बाबा पेट्रॉल पंप ते जालना रोड चे सर्वेक्षण करा म्हणुन सांगीतले होते त्याबाबतीत काय झाले. बाबा पेट्रॉल पंप ते जालना रोड येथे मेन पाईपलाईन गेलेली आहे व दोन्ही बाजुला व्यावसायीक वापर आहे मेन पाईप लाईनवरून एका एका व्यवसायीकाने 6 ते 8 नळ कनेक्शन घेतलेले आहे. |
| मा.सभापती | :मी स्वत:माहिती घेतलेली आहे व्यवसायीक नळ कनेक्शन 873 होते त्यात वाढ होउन 1100 झाले परंतु वास्तवात व्यवसायीक नळ कनेक्शनची संख्या हि साधारणत:33000 असावी. सदरील नळ कनेक्शनची वसुली केल्यास 60 कोटी रूपये वसूल होईल. |
| श्री.प्रशांत देसरडा | :नळ कनेक्शनसाठी महानगरपालिकेस 4500 खर्च येतो पाणी पुरवठयाचे खाजगीकरण करण्यात यावे त्याशिवाय सदरील समस्या सुटणार नाही. |

मा.आयुक्त श्री.वैद्य साहेब असतांना पाणी पुरवठयाचे खाजगीकरण करण्यात यावे फक्त रेकॉर्ड आणायचा होता परंतु ‍ चौकशी करायला पाहिजे जो रिकॉर्ड गायब झालेला असेल जो रेकॉर्ड नेला होता त्याचा जो खर्च होता तो वास्तवात आम्हाला मिळालेला पाहिजे. मा.सभापतीचे अभिनंदन करायला पाहिजे की त्यांनी हा रेकॉर्ड आणला 33000 नळ कनेक्शन पैकी 20000 तर नळ कनेक्शन निघाले असते. लातुर पॅटर्नची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा.सभापती :एक इंचला किती टॅक्स घेतो.

वार्ड फ अधिकारी :पाणीपट्टी नळ कनेक्शन दर दिनांक 01.04.2003 पासुन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंच | निवासी | निवासेत्तर |
|---|---|---|---|
| 1 | 1/2 व्यास | 1800=00 | 6500=00 |
| 2 | 3/4 व्यास | 2925=00 | 12000=00 |
| 3 | 1 व्यास | 6825=00 | 25000=00 |
| 4 | 1.5 व्यास | 30000=00 | 70000=00 |
| 5 | 2 व्यास | 50000=00 | 140000=00 |
| 6 | 3 व्यास | 80000=00 | 200000=00 |

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासन आता सहाव्या वेतन आयोगासाठी 8 ते 10 कोटींची तरतुद ठेवलेली आहे परंतु पाणी पट्टीत किंवा वसुलीबाबत प्रशासन नेहमी उदासिन धोरण अवलंबत असते. पाणीपट्टीत वाढ करा म्हणुन सांगणारे नगरसेवक हे फक्त औरंगाबाद शहरात पहावयास मिळेस प्रशासनास वारंवार पाणीपट्टी वाढवा सांगुनसुध्दा पाणीपट्टी वाढविण्यात आली नाही. प्रशासनाने वाढ का नाही सुचविली महानगरपालिकेचा लॉस भरून आला असता.

वार्डअधिकारी- फ :सन 2006-07 मध्ये 9 कोटीची डिमांड वसुल 2 कोटी रूपये म्हणजे 22 टक्के सन 2007-08 मध्ये 9.5 कोटी वसुली साधारणत: 29 टक्के सन 2008-09 मध्ये डिमांड 13 कोटी वसुली 3 कोटी 5 लाख रूपये-22 टक्के. सन 2009-10 मध्ये टार्गेटचे बिल तयार करण्याचे काम चालू आहे. पाणीपुरवठामध्ये थकबाकी काही विशिष्ट भागात उदा. स्लम भागात जास्त प्रमाणात आहे. इंदिरानगर मध्ये 59 लाख 87 हजार रूपये. गारखेडा परिसरात, मिलिंदनगर भागात मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. थकबाकीदारांकडुन 59 लाख वसुलीसाठी पुर्ण रोडचे खोदकाम करावे लागेल. पाणी पुरवठा बंद करून वसूल करावे. मालमत्ता कर 10.82 व पाणीपट्टी 4.15 कोटी अशी 15 कोटी होते.

श्री.प्रशांत देसरडा : मला जो खुलासा अपेक्षित होता त्याचे उत्तर आत्ता आले आहे. 15 x 6 वॉर्ड = 90 कोटी थकबाकी. वॉर्ड अधिकारी यांनी माहिती काढली. वस्तुस्थिती मांडण्यास घाबरतात. परंतु वॉर्ड अधिकारी श्री.पाटणी यांनी न घाबरता बाजु मांडली त्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :एका एका वसाहतीचे 60 ते 70 लाख रूपये बाकी आहे म्हणजे स्लम भागात वसुली होत नाही. |
| मा.सभापती | :व्यावसायिक नळ कनेक्शनचे सर्वे करणे आवश्यक आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :महानगरपालिकेकडे निधी नाही म्हणून शासनाच्या योजना महानगरपालिका रद्द करत आहे. |
| मा.सभापती | :मा.आयुक्त यांच्या देखरेखखाली एक पथक नेमण्यात यावे, वार्ड अधिकारी यांनी जी माहिती सादर केली आहे ती योग्य आहे एक चांगली बाजू मांडली त्याच्यामुळे त्यांचे अभिनंदन करावे लागेल. एक गोष्ट स्पष्ट आहे की वास्तविक पाणी आणण्यासाठी रू.37 कोटी खर्च व वसुली 14 कोटी. 23 कोटी रूपये वॉटर वर्कस् पासून नुकसान होत आहे. थकबाकी 100 कोटी रूपयांची आहे चालू मागणी 30 कोटी रूपये हे वसुल करण्यासाठी एक टास्क फोर्स नेमण्यात यावे. मा.आयुक्तांनी त्यांच्या नियंत्रणात शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, अधिकारी फोर्समध्ये नेमण्यात येवुन जबाबदारी टाकण्यात यावी. |
| मुख्य लेखाधिकारी | :बजेटमध्ये चालू मागणी 104 कोटी रूपयांची आहे संबधीत विभागाकडुन माहिती प्राप्त झालेली आहे. 80 टक्के वसुली. पाणी पुरवठयाचे 40 आणि मालमत्ता 40 कोटी असे घेतलेले आहे. मागील वर्षाचे पाणीपुरवठा वसुली 18 कोटी सन 07-08 29 कोटी. वसुली आजही 29 कोटी रूपयांची आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :100 कोटी अंदाज पुस्तकात यावे किंवा नाही. |
| मुख्य लेखाधिकारी | :वेगळे स्टेटमेंट दाखवू शकतो, नियमाने दाखवायची गरज नाही. बजेट बुक आहे. Balance Sheet मध्ये थकबाकीचे स्वतंत्र स्टेटमेंट दाखवू शकतो. सदरचे बजेट बुक आहे Balance Sheet नाही Profit & Loss अकाँउटमध्ये दाखवू शकतो. सन 2006-07 पर्यंत Reconciliation झाले आहे. |
| मा.सभापती | :100 कोटीची थकबाकी डिमांडमध्ये घ्यावी किंवा नाही. केव्हा पासून Reconciliation केले आहे. |
| मुख्य लेखाधिकारी | :महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून Reconciliation केलेले आहे. |
| लेखाधिकारी | :सन 2006-07 पर्यंत Reconciliation झालेले आहे. |
| मुख्य लेखाधिकारी | :मागील अंदाजपत्रकावरुन अंदाज घेवुन अंदाजपत्रक तयार केले जाते. सर्वच थकबाकी घ्यावे असा नियम नाही घ्यायची असेल तर घेता येईल. |
| श्री.विनायक पांडे | :अंदाजपत्रकात स्पिल ओव्हरचे कामे दाखविण्यात आलेली आहे. |
| मुख्य लेखाधिकारी | :काम सुरू झाले आणि ते काम अर्धवट राहिले आहे ते स्पिल वर्क आहे. लेखा विभागास जी स्पिल वर्कच्या कामाची यादी आलेली आहे त्यात बदल करता येत नाही. |
| मा.सभापती | :आर्थीक वर्षामध्ये ते कामे झालेली नाही परंतु वर्क ऑर्डर झालेली आहे वर्क ऑर्डर होउन सुध्दा कामे झालेली नाही त्याला स्पिल वर्क असे म्हणतात. |

मुख्य लेखाधिकारी :60 कोटी रूपये स्पिल वर्कच्या कामांसाठी ठेवलेले आहे. स्पिल वर्क आणि नविन कामांसाठी 60 कोटी रूपये ठेवलेले आहे. 75 कोटीची स्पिल वर्कची यादी आहे.

मा.सभापती :स्पिल वर्क बाबत समाधान झालेले नाही प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता :या पुस्तकात जी स्पिल वर्कची कामे घेतलेली अलॉटमेंट ऑर्डर घेतलेली कामे घेतलेली नाही. जी जी वर्क ऑर्डर मागच्या वेळेस झालेले आहे ते स्पिलचे कामे आहे.

मा.सभापती :या पुस्तकात मागील स्पिल वर्क दाखविलेले नाही.

शहर अभियंता :नजरचुकीने झाले असेल ज्या ज्या कामांचे वर्क ऑर्डर झालेले आहे ते सर्व स्पिल वर्क आहे.

मा.सभापती :75 कोटी स्पिल आले कशावरून घेतले.

मुख्य लेखाधिकारी :संबधीत विभागाने यादी दिली त्यानुसार घेतली आहे.

मा.सभापती :कामांची तजवीज कशामुळे अंदापत्रकाच्या पुस्तकात घेतली आहे. संबधीत विभागाने स्पिल वर्कची यादी दिली ती ठेवली कशाच्या आधारे ठेवली गेली.

कार्यकारी अभियंता :पुर्वी मा.आयुक्त श्री.वैद्य साहेब यांच्या सोबत बैठक झाली त्या बैठकीत स्पिल वर्कची यादी कशी पाठवायची याबाबत मा.आयुक्तांनी निर्देश दिले की, स्पिल वर्क दिलेले आहे ते काम स्पिल वर्कमध्ये आले पाहिजे. बजेटमध्ये यादीआलेली आहे त्यातही नविन कामामध्ये टाकाण्यात आले.

श्री.प्रशांत देसरडा :38 कोटींचे स्पिल वर्कचे कामे होती.

कार्यकारी अभियंता :मंजूर कामे आणि चालू कामे Liability Creat झालेली आहे 75 कोटीची कामे ठेवलेली आहे. बजेटची यादी आलेली आहे नविन यादी करा ती पण बजेटमध्ये टाकण्यात येईल. मागच्यावेळी नविन चालू एकत्र केले होते.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेत आणि स्थायी समिती सभेत मा.आयुक्तांनी फुगीर बजेट नको म्हणून सांगण्यात आले तरी 75 कोटीची यादी का दिली. तत्कालिन आयुक्तांनी निर्णय घेतला होता आम्हाला वसुस्थिती बजेट द्या म्हणुन. तत्कालिन आयुक्तांनी पुर्वी निधी नसतांना प्रत्येक नगरसेवकांच्या वार्डात 10 लाखापेक्षा जास्त कामे करू शकत नाही म्हणून आदेश काढलेले होते.

श्री.प्रशांत देसरडा :सदस्यांच्या वतीने विनंती करण्यात येते की, स्पिल वर्कचे कामांची यादी मागवून घ्या त्याची तपासणी करुन चौकशी करून घ्या जो काही टाईम बॉन्ड असेल तो चेक करण्यात यावा प्रशासनाकडे चुकून कामे आली असतील.

मा.सभापती :चौकशी करण्यास सर्वसाधारणमध्ये बजेट ठेवण्यास वेळ लागेल तो पर्यंत कामे सुरू करण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :सभेने मान्यता दिली तर कामे सुरू करता येईल.

श्री.विनायक पांडे :शासनाचा जो निधी आलेला आहे तो परत जावू नये म्हणून तातडीने पावले उचलावीत तातडीने कामांना मंजूरी देण्यात यावी. प्रशासकीय कारवाई तात्काळ करण्यात यावी. 27 कोटींचा निधी शासनाचा आलेला आहे तो परत पाठविणे योग्य नाही. शासनाचा निधी वापरता आला पाहिजे.

मा.सभापती :शासनाचा निधी परत जावू नये म्हणून प्रशासनाने दक्षता घ्यावी. स्थायी समिती बजेटला मान्यता देत आहे. इस्टिमेट तात्काळ तयार करण्यात यावे.

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | :आरसीएच प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी आदेश देण्यात आले शासनाच्या निर्देशाप्रमाणे 35 % च्या वर आस्थापना खर्च जायला नको परंतु प्रशासनाने याकडे दुर्लेक्ष केलेले आहे. |
| मा.सभापती | :25 ऑगष्ट नंतर आचारसंहिता लागू होईल बजेटला मान्यता दिल्यावरही कामे सुरू होणार आहे काय? |
| शहर अभियंता | :कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा केली आहे सर्वच सर्व इस्टिमेट ताबडतोब तयार करतो. अंदाजपत्रकातील स्पिल वर्कचे संपूर्ण कामे करू. |
| श्री.रविकांत गवळी | :493 कोटीचे बजेट आता 515 कोटींचे अंदाजपत्रक झाले आहे. काही नगरसेवकांची अत्यावश्यक कामे आहे तर सर्वच नगरसेवकांचे कामे झाली पाहिजे अशी तरतुद ठेवली पाहिजे. दुरूस्ती करण्याचे अधिकार मा.सभापती यांना देण्यात येतात. |
| श्री.प्रशांत देसरडा | :मा.सभापती यांना दोनदा बजेट सादर करण्याची संधी मिळालेली आहे त्यामुळे दांडगा अभ्यास मा.सभापती यांचा झालेला आहे त्यामुळे विकास कामांना तातडीने सुरवात होईल अशी आशा व्यक्त करतो तसेच सर्व अधिकार मा.सभापती यांना देण्यात येतात. |
| श्री.विनायक पांडे | :सर्व सदस्यांच्या वतीने दुरूस्तीचे सर्व अधिकार मा.सभापती यांना देण्यात येतात महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल याकडे मा.आयुक्तांनी लक्ष दयावे. |
| मा.सभापती | :एमजीएम ते लक्ष्मणचावडी रोड तसेच जाफरगेट व्यापारी संकुलचा ठराव सन 2007 रोजी पास झलेला आहे यासाठीही आर्थीक तरतुद चार कोटींची ठेवण्यात आलेली आहे यात 2 कोटींची वाढ केलेली आहे. महात्मा फुले पुतळयामागे बाराभाई ताजीया ते दिवाण देवडी, जाफरगेट आरक्षण क्रमांक 82 सिटीएस क्रमांक 12956 व व्यापारी संकुल वाहतुक बेट बनविण्यासाठी 4 कोटी रूपये बाराभाई ताजीया ते दिवाण देवडी रोड आणि दुसरा एमजीएम ते लक्ष्मणचावडी रोड आणि रोशन गेट ते आझाद चौकसाठी 1 कोटी 72 लाखांची तरतुद केलेली आहे. सराफा रोडसाठी 2कोटी 50 लाखांची तरतुद केलेली आहे. हर्सुल सर्वेनंबर 192/5 मधील रस्त्यासाठी प्रशासनाने 2 कोटी 50 लाखांची तरतुद केली होती ती 3 कोटींची करण्यात आली आहे. रहिमा मस्जिद ते बारी कॉलणी रोडसाठी तरतुद केली आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जे विशेष भांडण चालले आहे पोलीसांमार्फत रस्त्या लगतच्या ज्या टपऱ्या उचलतात नागरीक पदाधिकाऱ्यांकडे येवुन त्रास देतात पोलीसांमार्फत वारंवार कारवाई होत आहे. हॉकर्स झोनसाठी तत्कालिन आयुक्त मा.श्री.गुप्ता साहेब असतांना हातगाडी परवाने पासुन किती रक्कम वसुल झाली आहे याबाबत माहिती देण्यात यावी. किती हातगाडया होत्या याची संख्या देण्यात यावी. |
| श्री.रविकांत गवळी | :42000 हातगाडयांना मान्यता दिली होती. |
| मा.सभापती | : किती रक्कम जमा आहे महानगरपालिकेकडे याचा खुलासा करण्यात यावा. |
| मालमत्ता अधिकारी | :25 लाख 86 हजार रक्कम जमा झाली |
| मा.सभापती | :किती व्यक्तिंना परवाना दिला कोणत्या वर्षी झाले. |

मालमत्ता अधिकारी : सन 2007 पर्यंत.

मा.सभापती : त्यानंतर जे हातगाडी वाढल्या त्याचा रेकॉर्ड आहे काय?

मालमत्ता अधिकारी : 85 लाख 86 हजार वसुली झाली होती तद्नंतर मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार टपऱ्यांना 7.50 मिटर, 45 मिटरच्या रोडवरच्या टपऱ्यांना स्थगीती दिली होती. ते काढण्यासाठी आदेश दिले होते. यानंतर टपऱ्यांकडुन हातगाडयाकडुन कुठलीही वसुली झाली नाही.

मा.सभापती :कुठल्या कुठल्या रोडमध्ये परवानगी देवू शकत नाही.

मालमत्ता अधिकारी :7.50 मिटरच्या पुढे परवानगी देवू शकत नाही.

मा.सभापती : शहागंज येथील मेटाडोर उभी राहतात ते कशे उभे राहतात. त्यातुन मोबदला मिळतो काय? हॉकर्स झोनचे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विशेषत: पोलिस स्टेशन आणि ट्राफिक विभागाकडुन एनओसी मिळाली तर हॉकर्सला शुल्लक आकारणी घेवुन परवानगी देण्यात यावी. अभिनंदनाची बाब आहे की, समांतर जलवाहिनीचे जे टेंडर आहे शासनाने वारंवार निर्देश दिलेले आहे ते केव्हा पब्लिश करणार आहे.

कार्यकारी अभियंता :टेंडरचे कागदपत्र जमा करण्याचे काम सुरू आहे,जे कन्सलटंन्ट आहे त्यांना बोलावण्यात आले आहे, लवकरात लवकर टेंडर काढण्यात येईल.

मा.सभापती :मा.मुख्यमंत्र्यानी मला स्वत:बोलावुन समांतर जलवाहिनीच्या टेंडरबाबत विचारणा केली. समांतर जलवाहिनी योजने करीता केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यावर कार्यवाही चालू आहे. केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे टेंडर 03 दिवसांत काढण्यात यावे. सुजल निर्मल अभियान 2010 औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा सुधारणा 40 कोटीची असुन 28 कोटींचे शासनाचे अनुदान रूपये 12 कोटीचे महानगरपालिकेचा हिस्सा असुन यास मान्यता आहे.

श्री.प्रशांत देसरडा :आचारसंहितेपूर्वी प्रक्रिया पुर्ण होईल का ? क्रॉग्रेस पक्षाची राज्यामध्ये आणि क्रेंद्रामध्ये सत्ता आहे MSEB चा जो विद्युत पुरवठा घेतो पाणी पुरवठयासाठी तो महानगरपालिकेला ग्रामीन दराने लावण्यात यावा. कोल्हापूर महानगरपालिकेला मा.सुशील कुमार शिंदे यांनी ग्रामीण दराने विद्युत पुरवठा दिलेला आहे. आपणही तसे प्रयत्न करावेत शहराला जो पाणीपूरवठा होतो तो ग्रामीण दराने विद्युत देयक दिले गेले पाहिजे अशा प्रकारे प्रयत्न केला पाहिजे. विद्युत बिलाचा बराचसा भार कमी होईल.

श्री.रविकांत गवळी :कृषी दराने विद्युत देयक आकारले गेले पाहिजे.

मा.सभापती :तत्कालिन आयुक्त मा.बंड साहेब मी स्वत: आणि इतर अधिकारी Exhibition मध्ये गेलो होतो, ड्रिनेज सफाईचे यंत्र हे 100 कोटीचे होते व इतरही यंत्र सामुग्री होती. महानगरपालिकेची सध्या आर्थीक स्थिती बरोबर नाही साफसफाईसाठी 5 कोटीची नविन मशनरी खरेदी करावी लागेल जी मशनरी गल्ली गल्लीत जाते त्यात एक ड्रिनेज चोकअपची मशीन आहे. त्यासाठी 6 कोटी रूपये ठेवण्यात आलेले आहे. उपरोक्त प्रमाणे उत्पन्न खर्चात वाढ प्रस्तावित करून निव्वळ उत्पन्नात रूपये 21 कोटीची वाढ करून 19.50 कोटी विकास व देखरेखच्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात येते.

प्रशासनाने सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रक 494 कोटी 52 लाख यामध्ये 21 कोटींची वाढीनुसार 15.52 कोटीची जमा बाजू 515.40 कोटीची खर्चाप्रमाणे रूपये 12 लाखाचे शिल्लकी अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार मुळ अंदाजपत्रकात दुरूस्तीसह मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेसमोर मांडण्यासाठी शिफारस करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार सन 2009-10 चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आले.

सन 2009-10 च्या मुळ अंदाजावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्वक चर्चा करून व केलेल्या सुचनांची दखल घेऊन मुळ अंदाज पत्रक रू.509 कोटी 95 लाख 30 हजार जमा, यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.10 कोटी 55 लाख 85 हजार असे एकुण रू.520 कोटी 51 लाख 15 हजार जमेचा विचार करून खर्च रू.520 कोटी 39 लाख 60 हजार अपेक्षित धरता रू.11 लाख 55 हजाराच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले सन 2009-10 चे मुळ अर्थसंकल्पात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सभापती, स्थायी समिती व स. सदस्यांच्या सल्ल्यानुसार फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन प्रस्ताव फेरफार/दुरूस्तीसह मान्य करून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद